# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 21.04.2024** **वार: रविवार**

---

**पुणे प्रचार**

पुणे जिल्ह्यातल्या चारही लोकसभा मतदारसंघात प्रचाराला आता वेग आला आहे. येत्या ८ ते १० दिवसांत सर्वच पक्षांचे वरिष्ठ नेते पुण्यात प्रचारासाठी येणार आहेत. भाजपचे वरिष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २९ तारखेला एसपी कॉलेज मैदानावर सभेला संबोधित करणार आहेत. भाजपा नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिश्व सर्मा प्रचारासाठी येणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. महविकास आघाडीसाठीही कॉंग्रेसच्या प्रियांका गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी, पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, शरद पवार आदी नेते प्रचारासाठी येणार आहेत.

**वंचित मावळ**

वंचित बहुजन आघाडीनं मावळमधून माधवी जोशी आणि शिरूरमधून आफताब अन्वर शेख यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

**पुरंदर प्रचार**

पुरंदर तालुक्यात महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी सर्व नेते एकवटले आहेत. या पार्श्वभूमीवर आज माजी मंत्री विजय शिवतारे, भाजप नेते बाबा जाधवराव आणि  तरुण नेते जय पवार यांच्या संयुक्त दौऱ्याचं आयोजन करण्यात आलं आहे.

**महावीर जयंती**

जैन तीर्थंकर महावीर यांच्या जयंतीनिमित्त जैन समाज बांधवांनी आज जन्म कल्याणक महोत्सवाचं आयोजन पुण्यात विविध ठिकाणी केलं होतं. या निमित्त शोभायात्रेचं आयोजनही करण्यात आलं होतं. शहरातील जैन स्थानकांमध्ये रक्तदान शिबिर घेण्यात आलं; या निमित्ताने हिंदी विवेक प्रकाशित ‘तीर्थंकर भगवान महावीर’ विशेषांकाचे प्रकाशनही आज करण्यात आलं.

**सिद्ध लेखिका**

साहित्यासह विविध क्षेत्रात स्त्रिया क्षमता सिद्ध करत असताना ग्रामीण भागात स्त्रियांच्या आवडीनिवडीविषयी अनास्थेचं वातावरण आहे. ही तफावत आणि विषमता दूर करण्यासाठी स्त्री साहित्यिकांनी लिहितं राहावं असं मत ज्येष्ठ लेखिका डॉक्टर अरुणा ढेरे यांनी व्यक्त केलं. 'आम्ही सिद्ध लेखिका'च्या पुणे विभागातर्फे आयोजित दुसऱ्या राज्यस्तरीय महिला साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्या बोलत होत्या.

**ससून अधीक्षक**

ससून रुग्णालयात रुग्णाला उंदीर चावल्याप्रकरणी वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर अजय तावरे यांना पदावरून हटवण्यात आलं आहे. वैद्यकीय शिक्षण आयुक्तांनी हा निर्णय घेतला आहे. रुग्णालय अधिष्ठात्यांना नवीन अधीक्षक नेमण्याचे आदेश वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी दिले आहेत. अतिदक्षता विभागातल्या रुग्णाचा उंदरानं चावा घेतल्याप्रकरणी नेमण्यात आलेल्या समितीने त्यांचा अहवाल सादर केला. त्यानंतर ही कारवाई केली आहे. तर तीन कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

**<u>पाणीगैरवापर</u>**

पुण्यात अनेक भागात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या पाण्याच्या गैरवापराची पाहाणी आणि कारवाई करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याचं पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी मान्य केलं आहे. बहुतांश कर्मचारी निवडणूक कामासाठी नियुक्त झाल्यानं पाणी गैरवापर रोखण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करणं अवघड असल्याचं स्पष्टीकरण पालिका प्रशासनानं विविध सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्थांना दिलं आहे. सध्या पाणीकपात होत नसली तरीही गैरवापर असाच सुरू राहिला तर काही दिवसांनी दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ येईल अशी शक्यता या संघटनांनी व्यक्त केली आहे.

**<u>अनधिकृत बांधकामे</u>**

पुणे शहरातल्या अनधिकृत बांधकांमांना महापालिका प्रशासनानं नोटीस बजावल्यानंतर त्याच महिन्यात कारवाईचा अहवाल देण्याचे आदेश आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिले आहेत. पालिकेने दोन महिन्यांपूर्वी आंबेगाव बुद्रुक इथं केलेल्या कारवाईमुळे अनधिकृत इमारतीत राहाणाऱ्या रहिवाशांना फटका बसला त्यानंतर पालिकेनं हा निर्णय़ घेतला आहे.

**<u>भाजी फळ बाजार</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज विविध राज्यांमधून ८० ते ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. उन्हाळा आणि अवकाळी पावसामुळे भाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. फळ बाजारात रत्नागिरी, देवगडसह कर्नाटकातूनही साडेचार हजार पेट्या आंब्याची आवक झाली आहे. आंब्याच्या भावात २० टक्के घसरण झाली आहे.

**<u>रेल्वे</u>**

पावसाळ्यात दरडी कोसळून पुणे-मुंबई रेल्वेमार्गावरील सेवा विस्कळीत होते. त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीनं लोणावळा ते कर्जत घाटमाथ्याची पाहणी मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक राम करण यादव यांनी केली. वारंवार दरडी कोसळण्याची ठिकाणे तपासून त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

**<u>दूध अनुदान</u>**

दुग्ध व्यवसाय विकासच्या वतीनं दोन लाख ७२ हजार २९९ दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात प्रतिलीटर पाच रुपये दरानं १७६ कोटी ९२ लाख ४८ हजार रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. अशी माहिती पुणे दुग्ध व्यवसाय विकास आयुक्त प्रशांत मोहोड यांनी दिली आहे.२३५ दूध प्रकल्पांनी ऑनलाईन नोंदणी केल्यामुळे दूध उत्पादक शेतकरी अनुदानाला पात्र ठरले असल्याचं मोहोड यांनी सांगितलं.

**<u>हवामान</u>**

पुणे शहरात आज कमाल तापमान ३८ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २० पूर्णांक ९ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. कालच्या पावसामुळे तापमानात घट नोंदवण्यात आली. उद्या आकाश निरभ्र राहण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**